प्रशासकीय मान्यता

विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालयांची विनिर्दिष्टीत कामे केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील सार्वजनिक उपक्रम असलेल्या कंपनीकडून वा तत्सम कंपनीकडून टर्न की तत्वावर करुन घेण्याकरीता सदर कंपनीस निधी उपलब्ध करुन देण्यासाठी नविन लेखाशीर्ष निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सीआरसी-२०१८/प्र.क्र.९२/प्रशा-१
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नविन इमारत, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक: १९ मे, २०१८.

वाचा :-

१. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्रमांक : पीएमसी-२०१७/ १११५/प्र.क्र.४२३(अ)/प्रशा-१, दिनांक ०८.०२.२०१८
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्रमांक : पीएमसी-२०१७/ १११५/प्र.क्र.४२३(क)/प्रशा-१ दिनांक ०८.०२.२०१८
३. प्रधान महालेखाकार कार्यालयाच्या वरिष्ठ लेखा अधिकारी/ख.वि. यांचे पत्र क्रमांक : ख.वि/चा-१/वैद्यकीय शिक्षण - औषधी द्रव्ये विभाग/यूओआर-१४३/ २०१७-१८/९८७, दिनांक १४.०३.२०१८.

प्रस्तावना : -

मा.मंत्रीमंडळाने दिनांक ३०.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत वैद्यकीय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालयांची रुपये २५.०० कोटी व त्यापेक्षा जास्त अंदाजपत्रकीय किंमतीची बांधकामे केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील प्रामुख्याने रुग्णालयीन बांधकामाशी संबंधीत NBCC, HLL व HSCC या सार्वजनिक उपक्रम असलेल्या कंपन्यांना शासनाच्या पॅनलवर घेऊन यापैकी न्यूनतम देकार असलेल्या कंपनीला किंवा अन्य दुसऱ्या कंपन्यांकडून दर मागवून विहीत शासकीय प्रक्रिया पार पाडून सदरहू बांधकामे टर्न की तत्वावर करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. याबाबत संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) नुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने अशा स्वरुपाच्या बांधकामासंबंधी कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी एक नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन घेण्याची बाब शासन विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालयांची रुपये २५.०० कोटी व त्यापेक्षा जास्त अंदाजपत्रकीय किंमतीची बांधकामे केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील प्रामुख्याने रुग्णालयीन बांधकामाशी संबंधीत NBCC, HLL व HSCC या सार्वजनिक उपक्रम असलेल्या कंपन्यांना शासनाच्या पॅनलवर घेऊन यापैकी न्यूनतम देकार असलेल्या कंपनीला किंवा अन्य दुसऱ्या कंपन्यांकडून दर मागवून विहीत शासकीय प्रक्रिया पार पाडून सदरहू बांधकामे टर्न की तत्वावर करण्याकरीता निवडण्यात आलेल्या कंपन्यांना बांधकामांसाठी निधी अर्थसंकल्पीत करुन घेण्याकरीता व प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग करण्यासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टांसह लेखाशीर्ष निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

मागणी क्रमांक/ Demand No.	एस-०४	S-04
मुख्यलेखाशीर्ष/ Major Head	४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च	4210-Capital Outlay on Medical Public Health
उप मुख्यलेखाशीर्ष/ Sub Major Head	०३ - वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन	01- Medical Education, Training and Research
गौणशीर्ष/ Minor Head	१०५- विषम चिकित्सा राज्य योजनांतर्गत योजना	105-Allopathy under State Plan
गट व उप गटशीर्ष/ Group & Sub Group Head	(००) (५३) शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालयांची विनिर्दिष्टीत कामे केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील सार्वजनिक उपक्रम असलेल्या कंपनीकडून वा तत्सम कंपनीकडून टर्न की तत्वावर करुन घेणेबाबत.	(00) (53) Execution of Specified Construction Works of Government Medical/Dental/ Ayurved Colleges and Hospitals on Turnkey basis by Public Sector Undertaking Companies under control of Government of India or other correspondence companies on Turnkey basis.
संगणक संकेतांक/ CRC Code	४२१० २६२५	4210 2625
उद्दिष्टे/Objects	५३- मोठी बांधकामे	53- Major works

२. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.३२५/अर्थ-९/१८,दिनांक २४.०४.२०१८ अन्वये मिळालेल्या मान्यतेने तसेच प्रधान महालेखाकार कार्यालयाच्या वरिष्ठ लेखा अधिकारी/ ख.वि. यांचे पत्र क्रमांक : ख.वि/चा-१/वैद्यकीय शिक्षण - औषधी द्रव्ये विभाग/यूओआर-१४३/

२०१७-१८/९८७, दिनांक १४.०३.२०१८ च्या पत्रान्वये मिळालेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५१९१६५०५३५९१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2018.05.19 17:06:53 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर, महाराष्ट्र.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
९. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१२. संचालक, आयुष संचालनालय, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई.
१३. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालये
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१७. वरिष्ठ लेखा अधिकारी, प्रधान लेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर, महाराष्ट्र.
१८. उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-९/व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१९. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
२०. उप सचिव (वैसेवा/आयु/शिक्षण/अलेप), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई.
२१. निवडनस्ती (प्रशा-१)